# English Speaking Series

## (Lesson No. 03)

## Constructions of Simple Sentences:

### Use: was / were

- 

| | |
|---|---|
| (1) I am happy.<br>– मी सुखी आहे. | I **was** happy. ( आय् वॉझ़ हॅपि. )<br>– मी सुखी होतो / होते. |
| (2) We are happy.<br>– आम्ही सुखी आहोत. | We **were** happy. ( वी वर् हॅपि. )<br>– आम्ही सुखी होतो. |
| (3) You are happy.<br>– तू सुखी आहेस. | You **were** happy. ( यू वर् हॅपि. )<br>– तू सुखी होतास / होतीस. |
| (4) You are happy.<br>– तुम्ही सुखी आहात. | You **were** happy. ( यू वर् हॅपि. )<br>– तुम्ही सुखी होता. |
| (5) He is happy.<br>– तो सुखी आहे. | He **was** happy. ( ही वॉझ़ हॅपि. )<br>– तो सुखी होता. |
| (6) She is happy.<br>– ती सुखी आहे. | She **was** happy. ( शी वॉझ़ हॅपि. )<br>– ती सुखी होती. |
| (7) It is small.<br>– ते लहान आहे. | It **was** small. ( इट् वॉझ़ स्मॉल्. )<br>– ते लहान होते. |
| (8) They are happy.<br>– ते / त्या / ती सुखी आहेत. | They **were** happy. ( दे वर् हॅपि. )<br>– ते / त्या / ती सुखी होते / होत्या / होती. |

- 

- am, is आणि are ही be या क्रियापदाची वर्तमानकाळाची रूपे आहेत, हे आपल्याला माहीत आहे. ही रूपे वापरून वरील डावीकडील वाक्ये केली आहेत.

  was ( वॉझ् ) आणि were ( वर् ) हीसुद्धा be या क्रियापदाचीच रूपे आहेत, पण ती भूतकाळाची रूपे आहेत. ही रूपे वापरून वर उजवीकडे वाक्ये लिहिली आहेत. ती वाक्ये भूतकाळात आहेत, ही गोष्ट स्पष्टच आहे.

  **लक्षात ठेवा :** am व is चा भूतकाळ **was** आहे. are चा भूतकाळ **were** आहे.

- was आणि were या क्रियापदांपुढे **not** हा शब्द वापरला म्हणजे भूतकाळातील नकारार्थी वाक्य तयार होते.

  उदा : (1) I **was not** happy. – मी सुखी नव्हतो. / नव्हते.

  (2) He **was not** a doctor. – तो डॉक्टर नव्हता.

  (3) They **were not** in Mumbai yesterday. ( यस्टर्डे ) – काल ते मुंबईत नव्हते.

  (4) The **cows were** not in the meadow. ( मेडो ) – गायी कुरणात नव्हत्या.

  **लक्षात ठेवा : wasn't** ( वॉझण्ट ) हे was not या दोन शब्दांचे संक्षिप्त रूप आहे.

  **weren't** ( वरण्ट् ) हे were not या दोन शब्दांचे संक्षिप्त रूप आहे.

- **was आणि were ही क्रियापदे वापरून खाली भूतकाळातील अनेक होकारार्थी व नकारार्थी वाक्ये दिली आहेत. ती काळजीपूर्वक मोठ्याने वाचा.**

  (1) She was a teacher. ( शी वॉझ् अ टीचर्. ) – ती शिक्षिका होती.

  (2) Yesterday was a bad day for me.
  ( यस्टर्डे वॉझ् अ बॅड् डे फॉर् मी. ) – कालचा दिवस माझ्यासाठी वाईट होता.

  (3) Atul was here the day before yesterday.
  ( अतुल वॉझ् हिअर् द डे बिफोर् यस्टर्डे. ) – अतुल परवा येथे होता.

- (5) The children were in the school at that time.
  ( द चिल्ड्रन् वर् इन् द स्कूल् ॲट् दॅट् टाइम्. ) – मुले त्यावेळी शाळेत होती.

  (6) The two lions were in the same cage.
  ( द टू लायन्स् वर् इन् द सेम् केज्. ) – ते दोन सिंह एकाच पिंजऱ्यात होते.

  (7) Those books were very costly.
  ( दोझ् बुक्स् वर् व्हेरि कॉस्ट्लि. ) – ती पुस्तके फार महाग होती.

  (8) We were in Pune in July last.
  ( वी वर् इन् पुणे इन् जुलाई लास्ट्. ) – गेल्या जुलैमध्ये आम्ही पुण्यात होतो.

  (9) Rohit was not a poor man. ( रोहित वॉझ् नॉट् अ पुअर् मॅन्. ) – रोहित हा गरीब मनुष्य नव्हता.

(10) My uncle was an author. ( माय् अंकल वॉझ् ॲन् ऑथर्. ) – माझे काका लेखक होते.

(11) They weren't thieves. ( दे वरण्ट् थीव्ह्झ. ) – ते चोर नव्हते.

(12) Raj Kapoor was an actor. ( राज कपूर वॉझ् ॲन् ॲक्टर्. ) – राज कपूर हा नट होता.

(13) Two hours ago these rooms were dirty.
( टू अवर्स् अॅगो दीझ् रूम्स् वर् डर्टि. ) – दोन तासांपूर्वी ह्या खोल्या घाणेरड्या होत्या.

(14) His handwriting was superb. ( हिज् हॅण्ड्राइटिंग् वॉझ् सुपर्ब्. ) – त्याचे हस्ताक्षर उत्कृष्ट होते.

-

(15) The soldiers were on the battlefield continuously for twenty hours.
( द सोल्जर्स् वर् ऑन् द बॅटल्फील्ड् कण्टिन्युअस्लि .... . ) – ते सैनिक सतत वीस तास रणांगणावर होते.

(16) Her birthday party was very successful.
( हर् बर्थ्डे पार्टि वॉझ् व्हेरि सक्सेस्फुल्. ) – तिच्या वाढदिवसाचा समारंभ फार यशस्वी झाला.

(17) The situation wasn't under control even during the curfew.
( द सिच्युएशन् वॉझण्ट् अण्डर् कंट्रोल् ईव्हन् ड्यूरिंग् द कर्फ्यू. )
– संचारबंदीच्या काळातदेखील परिस्थिती नियंत्रणाखाली नव्हती.

(18) Those people were not in that conspiracy.
( दोझ् पीपल् वर् नॉट् इन् दॅट् कॉन्स्पिरसि. ) – ते लोक त्या कटात नव्हते.

(19) There were many holidays in the last month.
( देअर् वर् मेनि हॉलिडेझ् इन् द लास्ट् मन्थ्.) – गेल्या महिन्यात पुष्कळ सुट्ट्या होत्या.

(20) There wasn't much sugar in the jar.
( देअर् वॉझण्ट् मच् शुगर् इन् द जार्.) – बरणीत फारशी साखर नव्हती.

-

**1. was किंवा were वापरून खालील वाक्ये पुन्हा लिहा :**

(1) That cow is old. ____________________

(2) We are not farmers. ____________________

(3) Satish is an engineer. ____________________

(4) My friends are in England. ____________________

(5) There is a fair in that village. ____________________

(6) He isn't my cousin. ____________________

-

Please follow and like us:

Follow
Share
Tweet
Save